प्रेसनोट दि.२५.०९.२०१९

<u>शिर्षक</u> :- इस्लामपुर पोलीस ठाणे येथील श्री. बाळासाहेब केशव पाटील, सपोफौ व श्री. सतिश मारुती माळी पोहेकॉ/२६६ यांना १०,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | इस्लामपुर पोलीस स्टेशन, गुरनं ६८३/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) श्री. बाळासाहेब केशव पाटील, वय ५८ वर्षे, सपोफौ इस्लामपुर पोलीस ठाणे, ता. वाळवा, जि. सांगली २) श्री. सतिश मारुती माळी, वय ४२ वर्षे, पोहेकॉ/२६६, इस्लामपुर पोलीस ठाणे, जि. सांगली दोन्ही वर्ग -३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे नातेवाईकांच्या विरुध्द इस्लामपुर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयामध्ये सहकार्य करण्यासाठी इस्लामपुर पोलीस ठाणेचे श्री. बाळासाहेब पाटील सपोफौ व श्री. सतिश मारुती माळी पोहेकॉ यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/-रुपयाची लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि. २४.९.२०१९ रोजी इकडील कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि.२५.९.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. बाळासाहेब पाटील सपोफौ व श्री. सतिश मारुती माळी पोहेकॉ यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम १०,०००/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर लागलीच इस्लामपुर पोलीस ठाणे येथे सापळा लावला असता श्री. बाळासाहेब पाटील सपोफौ वय ५८ वर्षे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची रक्कम श्री. सतिश मारुती माळी पोहेकॉ/२६६ वय ४२ वर्षे यांचेकडे देण्यास सांगीतले. त्यानंतर पोहेकॉ/२६६ माळी यांनी तक्रारदार यांचेकडुन १०,०००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता पोहेकॉ/२६६ माळी व सपोफौ पाटील यांना लाच रक्कम स्विकारले असता रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचे विरुध्द इस्लामपुर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबेंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.**

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६
संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**
ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप :- **acbmaharashtra.net** टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ व्हॉट्सॲप क्रमांक :- ९८२३६१८००१